RAJ OIL MILLS LIMITED

224-230 Bellasis Road, Mumbai, Mh 400008
CIN: L15142MH2001PLC133714
Email Id: cs@rajoilmillsltd.com

NOTICE

Pursuant to Regulation 29 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirement) Regulations, 2015, Notice is hereby given that the meeting of Board of Directors of Raj Oil Mills Limited (The Company) will be held on Friday, July 24, 2020 to consider and approve Standalone Audited Financial Results of the Company for the Year and Quarter ended March 31, 2020.

For Raj Oil Mills Limited
Sd/-
Ankit Kumar Jain
Company Secretary & Compliance Officer

जाहीर नोटीस

सर्व संबधितांना याद्वारे जाहीर करतो की श्री. अशरफ गुलाम रसुल पटेल यांची मालकी हक्काचे खुली जागा ज्यांचे सर्वे नं. १०८ हिस्सा नं. ३, क्षेत्र ५.०३ गुंठा, सर्वे नं. १०९ हिस्सा नं. ७ क्षेत्र ०.००.८ गुंठा सर्वे नं. १४४ हिस्सा नं. १ क्षेत्र ०.०७.१ गुंठा गाव घोडबंदर, तालुका-ठाणे जिल्हा-ठाणे हि जागा मी श्री. नफिस अमिरअली पंजवानी विकत घेतली आहे.

तरी सदर जागेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध वा अधिकार असल्यास तो त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाले दिवसापासून १४ दिवसांचे आत निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या खालील पत्यावर लेखी कागदोपत्री कळवावा. अन्यथा तसा कोणाचाही प्रकारचा हक्क हितसंबंध वा अधिकार नाही असे समजून वा असल्यास तो सोडून देण्यात आली आहे. सही.

खरीदाराचे वकील
बी.आर. मिश्रा
दु. नं. १४, एन.जी. वेदान्त, नियर आर.बी.के. स्कूल, मिरारोड (पूर्व), ठाणे – ४०११०७.

जाहीर सूचना

तमाम जनतेला सदर कळविण्यात येते की, आमचे अशील सौ. कोरल सलिल मोदी आणि श्री. सलिल सुरेश मोदी आणि श्री. सलिल सुरेश मोदी हे पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकडून अप्पर वरळी, लोअर परेल, मुंबई-४०००२५ येथील ''लोढा पार्कसाईड'' ''दि पार्क'' अशी सुध्दा ज्ञात मधील क्र. ए-५५०३, ५५ वा मजला, टॉवर २ ए (पार्कसाईड) धारक ओनरशीप फ्लॅट सरफैसी ॲक्ट, २००२ अंतर्गत खाजगी कराराने खरेदी करण्यासाठी प्रस्तावित आहेत. कोणीही व्यक्ती किंवा व्यक्तींचा सदर फ्लॅटवर कोणतीही हरकत किंवा दावा असल्यास त्यांनी आजपासून ७ दिवसांत निम्नस्वाक्षरीकारांना कळविणे आवश्यक आहे, नंतर सदर फ्लॅटचे पणनयोग्य नामाधिकार असल्याचे मानण्यात येईल.

सदर दिनांक १६, जुलै, २०२०
किरण जैन ॲण्ड कं.
क्वीन मॅन्शन, लोअर ग्राऊंड फ्लोअर, प्रेस्कॉट रोड, कॅथेड्रल स्कूल आणि जे. बी. पेटिट स्कूल जवळ, फोर्ट, मुंबई-४००००१.

जाहिर नोटीस

या द्वारे सर्वांना कळविण्यात येते की, श्री. इग्नेशियस (इनास) पीटर डिकोस्टा यांची मौजे आंबिस्ते खुर्द, ता. वाडा, जि. पालघर येथिल,

मिळकतीचे वर्णन

गट नंबर	क्षेत्र हे. आर.प्रती	आकार
२२८	०-४५-००	०-२८

वरील मिळकत त्यांनी आमचे अशिलांना विकण्याचे मान्य व कबुल केले आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाही ईसमाचा, व्यक्तीचा, गहाण, दान, दावा, वारस, वहिवाट व अन्य हक्क हितसंबंध असेल तर तो त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत निमस्वाक्षरी करांना **सिध्दी सोफी कॉप्लेक्स, शॉप नंबर ११५, कुडूस, ता. वाडा, जि. पालघर** या त्यांच्या पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह कळवावा. अन्यथा तसा हक्क हितसबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल.

दिनांक – १८/०७/२०२०
खरेदिदाराचे वकिल
ॲड. धिरज सि. पाटील

सांकेतिक कब्जा सूचना

ICICI Bank

शाखा कार्यालय: आयसीआयसीआय बँक, शाल टॉवर, न्यू राहटक रोड, करोल बाग, नवी दिल्ली-११०००५.

निम्नस्वाक्षरीकारांनी आयसीआयसीआय बँक लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अन्वये आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत सूचनेत नमूद केलेली रक्कम चुकती करण्यासाठी खालील नमूद कर्जदारांना मागणी सूचना जारी केल्या आहोत.

कर्जदारांनी सदरहू रक्कम चुकती करण्यास कसूर केलेली आहे म्हणून कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेला सूचना याद्वारे देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खालील नमूद तारखेरोजीस सदरहू अधिनियमाच्या कलम १३(४) सहवाचता सदरहू नियमावलीच्या नियम ८ अन्वये त्याला/तिला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील वर्णिलेल्या मिळकतीचा सांकेतिक कब्जा घेतलेला आहे. विशेषत: कर्जदार अणि सर्वसामान्य जनतेला याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करु नये आणि सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा कोणताही व्यवहार हा आयसीआयसीआय बँक लिमिटेडच्या प्रभाराच्या अधीन राहील.

अ. क्र.	कर्जदाराचे नाव/कर्ज खाते क्रमांक	मिळकतीचे वर्णन/प्रत्यक्ष कब्जाची तारीख	मागणी सूचनेची तारीख/ मागणी सूचनेतील रक्कम (रु.)	शाखेचे नाव
१	छडा सूपर कार्स प्रा. लिमिटेड/ गीता छडा/सुमेश छडा/ किरण सुमेश छडा खाते क्र. ०१०२५१००५८७२	१. फ्लॅट क्र. ४०५, ४ था मजला, एमएम स्पेक्ट्रा, पोस्टल कॉलनी, चेंबूर, सीटीएस क्र. ६१ (भाग), ६१/१३० ते १३५, ६१/१३८ ते १४६, गाव चेंबूर, श्रीमजिवी को-ऑप. हाऊ. सोसा. लि., चेंबूर पूर्व, इस्टर्न एक्स्प्रेस हायवे, मुंबई, महाराष्ट्र. २. फ्लॅट क्र.५०१, ५ वा मजला, एमएम स्पेक्ट्रा, पोस्टल कॉलनी, चेंबूर, सीटीएस क्र. ६१ (भाग), ६१/१३० ते १३५, ६१/१३८ ते १४६, गाव चेंबूर, श्रीमजिवी को-ऑप. हाऊ. सोसा. लि., चेंबूर पूर्व, इस्टर्न एक्स्प्रेस हायवे, मुंबई, महाराष्ट्र/ १३ जुलै, २०२०.	१९ डिसेंबर, २०१९ रू. १९,९१,२२,६८४	मुंबई

वरील नमूद कर्जदार/हमीदार यांना रक्कम चुकती करण्यासाठी याद्वारे ३० दिवसांची सूचना देण्यात येत आहे, अन्यथा सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८ आणि ९ अंतर्गत तरतुदींनुसार सदर सूचना प्रसिध्दी तारखेपासून ३० दिवसांच्या समाप्तीनंतर गहाण मिळकतीची विक्री करण्यात येईल.

दिनांक : १८-०७-२०२०
ठिकाण : मुंबई

प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय बँक लिमिटेड

इंडियन बँक Indian Bank

इलाहाबाद ALLAHABAD

ई-अलाहाबाद बँक, लार्ज कॉर्पोरेट ब्रांच,
२ रा मजला, अलाहाबाद बँक बिल्डिंग, ३७,
मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई – ४०००२३

जाहीर सूचना

तमाम जनता आणि विशेषकरून ग्राहकांना याद्वारे कळविण्यांत येते की, इंडियन बँक बरोबर अलाहाबाद बँकेने विलिनिकरण झाल्याच्या परिणामी असे ठरविण्यांत आले की, ई-अलाहाबाद बँक, लार्ज कॉर्पोरेट ब्रांच, मुंबई तात्काळ परिणामी खालील पत्यावरून कार्यरत होईल. **सर्व कॉर्पोरेट ग्राहकांनी** कृपया त्यांच्या व्यावसायिक आवश्यकतांसाठी खालील पत्यावर संपर्क साधावा.

इंडियन बँक, लार्ज कॉर्पोरेट ब्रांच मुंबई
२१०, मित्तल टॉवर, बी विंग, नरिमन पॉईंट, मुंबई – ४०००२१
दूरध्वनी : ०२२-४०१७८००३/४०१७८००४
ईमेल : corporatebranchmumbai@indianbank.co.in

रिटेल ग्राहकांनी (बचत बँक/चालू खाते/मुदत ठेवी/कॉर्पोरेशन सोडून सर्व कर्जदार) कृपया त्यांच्या व्यावसायिक आवश्यकतांसाठी ई-अलाहाबाद बँक, लार्ज कॉर्पोरेट ब्रांच, मुंबईच्या तळमजल्यावरील त्याच जागेत कार्यरत ई-अलाहाबाद बँकेच्या फोर्ट शाखेशी संपर्क साधावा :

ई-अलाहाबाद फोर्ट शाखा
तळमजला, अलाहाबाद बँक बिल्डिंग, ३७, मुंबई समाचार मार्ग,
फोर्ट, मुंबई – ४०००२३
दूरध्वनी : ०२२-२२६६२०१८/११११
ईमेल : br.mumfort@allahabadbank.in

ई-अलाहाबाद बँकेकडे ज्यांनी त्यांचे केवायसी तपशील आद्यतन केले आहेत त्या सर्व ग्राहकांना वैयक्तिक रित्या पत्र पाठवले आहे.

सही/-
शाखा व्यवस्थापक

स्वास्तिका इन्व्हेस्टमार्ट लिमिटेड

CIN: L65910MH1992PLC067052
नोंदणीकृत कार्यालय: फ्लॅट नं. 18, दुसरा मजला, नॉर्थ विंग, माधवेश्वर को-ऑप. एचजीएस सोसायटी लिमिटेड, माधवन नगर, 11/12, एस व्ही. रोड, अंधेरी डब्ल्यू, मुंबई, महाराष्ट्र:400001. टेलि नं : 022 : 26254568
इमेल : secretarial@swastika.co.in वेबसाईट : www.swastika.co.in

सूचना

कंपनीच्या समभागांचे हस्तांतर इन्व्हेस्टर एजुकेशन ॲंड प्रोटेकसन फंड (आईईपीएफ) कडे करण्यासाठी

फेरफार करण्यात आलेल्या इन्व्हेस्टर एजुकेशन ॲंड प्रोटेकसन फंड ऑथॉरिटी (अकाउंटिंग, ऑडिट, ट्रान्सफर आणि रिफंड) नियमावली, 2016 सह वाचल्या जणांच्या कंपनी कायदा, 2013 च्या लागू असणान्या तरतुदीच्या अनुसार सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे. नियम, अन्य बाबीमध्ये असणान्या तरतुदी अनुसार असे सर्व समभाग, ज्याचा लाभांश (लाभांशाचे) प्रदान करण्यात आलेले नाही किंवा सलग सात वर्षे किंवा त्याहून अधिक कालावधीसाठी संभागधारकांच्या द्वारे दावा करण्यात आलेला नाही त्यांचे हस्तांतरण कंपनीद्वारे 'इन्व्हेस्टर एजुकेशन ॲंड प्रोटेकसन फंड' मध्ये करण्यात येणार आहे.

नमूद नियमांच्या मान्यतेच्या अनुसार, संभागधारक ज्यांनी आर्थिक वर्ष 2012-13 पासून सलग सात वर्षांसाठी त्यांच्या लाभांशाचा दावा केलेला नाही आणि ज्याचे समभाग 'आईईपीएफ' कडे हस्तांतरित होण्यास पात्र आहेत, त्यांना विनंती करण्यात येत आहे कि त्याचा दावा करावा आणि संभागधारकांचा तपशील ज्यांचे समभाग आईइपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित होणार आहेत त्यांच्या तपशील कंपनीच्या **www.swastika.co.in** ह्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आलेला आहे.

संभागधारकांना विनंती करण्यात येत आहे कि संबंधित संभागधारक ह्यांच्याकडहून कंपनी/रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजेंट ह्याच्याकडे 01 सप्टेंबर 2020 पर्यंत प्राप्त न झाल्यास कंपनी, नियमांची पूर्तता करण्याचा दृष्टीने 'आईईपीएफ' कडे समभागांचे हस्तांतरण, अशा समभागांवर असलेल्या सर्व लाभांसह कालमर्यादीनुसार आणि निण्यांमध्ये विहित करण्यात आलेल्या प्रक्रियेनुसार, संभागधारकांना कोणतीही अतिरिक्त सूचना न देता हस्तांतरित करेल आणि अशा हस्तांतरित करण्यात आलेल्या समभंगाच्या संदर्भात कंपनीचे कोणतेही दायित्व राहणार नाही.

आतापासून ह्यापुढे कंपनीद्वारे जर अशा संभागावर लाभांश जाहीर केल्यास आईईपीएफ प्राधिकारनाकधे जमा करण्यात येईल. 'आईईपीएफ' कडे हस्तांतरित करण्यात आलेल्या संभागवरील अशा लाभांशाच्या संदर्भात कंपनीकडे कोणताही दावा करता येणार नाही. संभागधारक लाभांशाची रकम आणि आईईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आलेले संभागांचा दावा नियमांच्या अनुसार असलेल्या फार्म - आईईपीएफ-5 द्वारे आईइपीएफ प्राधिकरणाकडे भरून अर्ज करता येईल. नमूद अर्ज आईईपीएफ प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर म्हणजेच **viz.www.iepf.gov.in** वर उपलब्ध आहे.

भारतमध्ये कोविद-19 च्या झालेल्या उद्रेकामुळे भारतामधील बहुतांश ठिकाणी टपाल आणि/किंवा कुरियर सेवा उपलब्ध नसल्याची परिस्थिती ध्यानात घेता संबंधित संभागधारकांना ज्यांचे समभाग 'आईईपीएफ' कडे हस्तांतरित होण्यास लायक आहेत अशांना त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर वैयक्तिक सूचना पाठवणे कंपनीला शक्य नाही आणि सर्व सेवा सुरळीतपणे सुरु झाल्यावर ते पाठविण्यात येईल. दरम्यान संबंधित संभागधारकांना ज्यांच्या ई-मेल आईडीची नोंद कंपनी/रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजेंटच्याच्या ह्यांच्याकडे आहे त्यांना सूचना ई-मेलद्वारे पाठविण्याचे सर्वतोपरी प्रयत्न सुरु आहेत.

ह्यासंदर्भात जर कोणतीही समस्या असल्यास किंवा कोणतेही स्पष्टीकरण/सहाय्य पाहिजे असल्यास संबंधित संभागधारकांना विनंती करण्यात येत आहे कि त्यांनी कंपनी/रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजेंट ह्यांच्याशी संपर्क साधावा: रजिस्ट्रार ऍण्ड ट्रान्सफर एजेंट अंकित कन्सल्टन्सी प्रायवेट लिमिटेड, 60, इलेक्ट्रॉनिक कॉम्प्लेक्स, परदेशीपुरा इंदोर - 452010 (म. प्र.) टेल.:0731-4065799, 4065797, **Email: ankit_4321yahoo.com**

दिनांक 17/07/2020
ठिकाण मुंबई

बोर्डाच्या आदेशावरुन
स्वास्तिका इन्व्हेस्टमार्ट लिमिटेड करीता
सही
श्री. सुनील न्याती
मेनेजिंग डायरेक्टर
डीआयएन: 00015963

कृष्णा को-ऑप हौसिंग सोसायटी लि.

नोंदणी क्र.: एमयुएम/डबल्यू एफ-एस / एच.एस.जी. / (टिसी) / ९४९९ / सन २०१९
पत्ता- १५६, परेल शिवडी डिव्हीजन, झकेरिया बंदर रोड, शिवडी (प.), मुंबई-४०० ०१५

जाहीर नोटीस **१४.०७.२०२०**

जाहीर नोटीस देण्यात येते की, कृष्णा को-ऑप हौसिंग सोसायटी लि., नोंदणी क्र.: एमयुएम/डबल्यू एफ-एस / एच.एस.जी. / (टिसी) / ९४९९ / सन २०१९, पत्ता- १५६, परेल शिवडी डिव्हीजन, झकेरिया बंदर रोड, शिवडी (प.), मुंबई-४०० ०१५ ही महाराष्ट्र अधिनियम क्र.२४ कलम ९(१) अन्वये दि.२७.०५.२०१९ रोजी नोंदण्यात आलेली आहे. तत्पुर्वी दि.११ फेब्रुवारी, २०२० रोजी मा. उपनिबंधक, सहकारी संस्था, एफ/एस विभाग, मुंबई यांचे समक्ष नवीन कार्यकारिणी समितीकडे जुन्या कार्यकारिणी-समितिकडून संस्थेचा कारभार सुपूर्द करण्यात आला परंतू संस्था नोंदणी होणेपुर्वी मुख्य प्रवर्तक व समिती प्रवर्तक यांनी संस्था नोंदणी होणेचे दिनांकापर्यंत संस्थेच्या व्यवहारांचे लेखापालन केलेले नसल्याचे तसेच नोंदणी दिनांक २७.०५.२०१९ ते ११ फेब्रुवारी, २०२० पर्यंतच्या कालावधीतील विदित नमुन्यातील आर्थिकपत्रके बनविलेली नसून हिशेब दिलेला नाही.

यास्तव, दि.११ फेब्रुवारी, २०२० पर्यंत संस्थेच्या हिशेब, लेखापालन, आर्थिकपत्रके यांस पुर्वीची समिती जबाबदार राहील. तसेच या कालावधीमध्ये ज्यांचे हितसंबंध संस्थेच्या कामकाजाशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या जोडले गेले असल्यास किंवा कोणतेही अनाधिकृत, गैरव्यवहार, करार, झाले असल्यास त्यास संस्था जबाबदार राहणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

सही/-
स्थळ : मुंबई — अध्यक्ष — सचिव — खजिनदार
दिनांक : १८/७/२०२० — **कृष्णा को-ऑप. हौसिंग सोसा.लि.**

जनसेवा सहकारी बँक (बोरिवली) लिमिटेड

मुख्य कार्यालय: 'नंदधाम', लोकमान्य टिळक मार्ग, बोरिवली (पश्चिम), मुंबई -४०००९२.

संदर्भ: सरफैसी/५३३-५३/२३/२०२०-२१ **दिनांक: १३/०७/२०२०**

१. **मे. खोडीयार बिल्डर्स**
१, खोडीयार अपा., दौलत नगर रोड नं. ६, बोरिवली (पूर्व), मुंबई-४०००६६. .....कर्जदार
२. **श्री. देवचंदभाई रावजीभाई पटेल** .....सह-कर्जदार, गहाणकार व वैयक्तिक हमी
३. **श्री. दीपक देवचंदभाई पटेल** .....सह-कर्जदार, गहाणकार व वैयक्तिक हमी
४. **श्री. मेहूल देवचंदभाई पटेल** .....सह-कर्जदार, गहाणकार व वैयक्तिक हमी
५. **सौ. जयाबेन देवचंद पटेल** .....गहाणकार आणि जामीनदार
६. **सौ. रेशमा मेहुल पटेल** .....गहाणकार आणि जामीनदार
सर्व राहणार - बी/६०३, मार्बल आर्च,
५१, टीपीएस रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०००९२.

महाशय/महोदया,

विषय: १. आमच्या दहिसर पूर्व शाखेतील तुमचे कर्ज खाते क्र. ५३३/५३
२. सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यानंतर ''ॲक्ट'' असा उल्लेख) च्या कलम १३(२) अन्वये सूचना

१. मी, **जनसेवा सहकारी बँक (बोरिवली) लि.** जिचे नोंदणीकृत कार्यालय आहे नंद धाम, एल. टी. रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०००९२ येथे आणि इतर शाखांपैकी एक शाखा ममता बिल्डिंग, वामनराव सावंत मार्ग, दहिसर पूर्व, मुंबई-४०००६८ येथे यानंतर (''सदर बँक'' असा उल्लेख) द्वारे प्राधिकृत सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स २००२ अन्वये प्राधिकृत अधिकारी आहे.

२. तुमच्या विनंतीवरुन तुम्हाला ०४/१०/२०१३ दिनांकीत सदर बँकेच्या मंजुरी पत्रानुसार मे. खोडीयार बिल्डर्स (नोंदणीकृत भागीदारी संस्था) कर्ज खाते क्र. ५३३/५३ ला **रु. ३,००,०००/- (रु. तीन कोटी मात्र)** च्या ओव्हर ड्राफ्ट सुविधेच्या बाबतीत दहिसर (पूर्व) येथे तिच्या शाखेमार्फत सदर बँकेने वित्त सहाय्य मंजुर केले. ३०.०६.२०१४ दिनांकीत बँकेच्या मंजुरी पत्राप्रमाणे **रु. १,००,००,०००/- (रु. एक कोटी मात्र)** ने सदर ओव्हर ड्राफ्ट सुविधा वाढवली. **२७/११/२०१५** दिनांकीत सदर बँकेच्या मंजुरी पत्राप्रमाणे सदर ओव्हर ड्राफ्ट सुविधा पुन्हा **रु. १,७५,००,०००/- (रु. एक कोटी पंचाहत्तर लाख मात्र)** ने वाढवली ची एकूण **रु. ५,७५,००,०००/- (रु. पाच कोटी पंचाहत्तर लाख मात्र)** झाली. बँकेच्या नावे केलेल्या त्यावर तारण हितसंबंधाद्वारे विविध मत्तां सापेक्ष **३०/०१/२०१८** रोजीच्या सदर बँकेच्या मंजुरी पत्राप्रमाणे **रु. ५,७५,००,०००/- (रु. पाच कोटी पंचाहत्तर लाख मात्र)** ची सदर ओव्हर ड्राफ्ट सुविधा **रु. १,००,००,०००/- (रु. एक कोटी मात्र)** ने कमी करुन **रु. ४,७५,००,०००/- (रु. चार कोटी पंचाहत्तर लाख मात्र)** झाली.

३. सदर करार/दस्तावेजांच्या बाबतीत सदर वित्तीय सहाय्याच्या परतफेडीसाठी हमी देऊन तुम्ही वित्तीय सहाय्य घेतले.

४. तुम्ही क्र. २ ते ६ यांनी जंगम आणि स्थावर मिळकतींचे हक्क विलेख जमा करुन गहाण बनवले.

५. तारण मत्तांचे संबंधित तपशील येथे जोडलेल्या परिशिष्टांत विनिर्दिष्टीतपणे सांगितले आहेत.

६. तुम्ही वेळोवेळी निष्पादित अन्य दस्तावेज आणि वेळोवेळी केलेले प्रदान किंवा कर्ज आणि तारणांची पोचपावती, शिल्लकीच्या निश्चिती निष्पादित करून वरील सदर पतसुविधेच्या संदर्भातील दायित्वाची अस्तित्वातील पोच पावतीसुध्दा दिलेली आहे. मुद्दल कर्ज आणि त्यावरील व्याजाचे प्रदान करण्यास तुम्ही कसूर केल्यामुळे आणि वरील सदर वित्तीय सहाय्य/पतसुविधेचे परिचालन अनियमित बनले आणि कर्ज रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाद्वारे निर्गमित मत्ता वर्गीकरणाशी संबंधित निर्देश/मार्गदर्शनानुसार **३०/०६/२०१९ पासून नॉन परफॉर्मिंग ॲसेटस्** म्हणून वर्गीकृत झाले आहे.

७. आता बँक याद्वारे त्यामुळे बँक सदर सूचना प्राप्त झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांत सदर बँकेचे येथील खालील नमूद दायित्वे सोडविण्यासाठी सदर सूचना जारी करून अधिनियमाच्या कलम १३(२) अन्वये माझ्यामार्फत मुख्य कर्जदार/गहाणवटदार यांना बोलाविणे करित आहे. तुमचे बँकेसाठी थकीत दायित्त्व (एकूण), थकबाकी आणि देणी ही ३१/०५/२०२० पर्यंत त्यावरील उपार्जित व्याजासह सदर वरील नमुद सुविधेच्या अंतर्गत ३०/०६/२०२० रोजीस **रु. ४,६६,७९,०१४.४० (रु. चार कोटी सहासष्ट लाख एकोणऐंशी हजार चौदा व पैसे चाळीस मात्र)** आणि त्यावरील पुढील व्याज इतके आहे. तुम्ही, अनुषंगिक खर्च, परिव्यय, प्रभार, दंडात्मक व्याज इ. सह एकत्रित वरील सदर रकमेवर वेळोवेळी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाद्वारे निर्गमित मार्गदर्शक तत्त्वानुसार बँकेने जारी केलेल्या मार्गदर्शन तत्त्वानुसार पुढील व्याज चुकते करण्यासाठी सुध्दा जबाबदार आहात. तुमच्या ओव्हर ड्राफ्ट खाते क्र. ५३३/५३ साठी प्रयोज्य व्याजाचा विद्यमान दर द. सा. **११%** आहे. तुम्ही सदर कर्ज रकमेचा परतावा करण्यास कसूर केल्यामुळे विद्यमान व्याज दराच्या वर दरसाल **२%** दराने दंडात्मक व्याजसुध्दा चुकते करण्यासाठी जबाबदार आणि बांधील आहात.

८. जर तुम्ही ॲक्टच्या कलम १३(२) अन्वये सदर सूचनेनुसार वरील नमूदनुसार पुढील व्याज आणि अनुषंगिक खर्च, परिव्यय यासह ३०/०६/२०२० रोजीस **रु. ४,६६,७९,०१४.४० (रु. चार कोटी सहासष्ट लाख एकोणऐंशी हजार चौदा व पैसे चाळीस मात्र)** वरील सदर रक्कम बँकेला चुकती करण्यात कसूर केल्यास बँक सदर ॲक्टच्या अन्य प्रयोज्य तरतुदीन्वये आणि कलम १३ च्या पोटकलम (४) अन्वये तपशीलवार सर्व किंवा कोणत्याही हक्काचा वापर करेल.

९. तुम्हाला ही सुध्दा सूचना देण्यात येते की, कलम १३ च्या पोटकलम (१३) नुसार तुम्ही बँकेची लेखी सहमती प्राप्त केल्या शिवाय सदर सूचनेच्या परिशिष्ट ''ए'' तपशील दिलेली सदर तारण मत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा अन्यथा द्वारे हस्तांतर करू शकत नाही.

१०. बँकेने त्यानंतर निर्माण होणारी तसेच अन्य अनुषंगिक दायित्वे आणि सदर कर्ज खात्याअंतर्गत संपूर्ण दायित्वे चुकती करण्यासाठी तुम्हाला बोलाविण्याचा हक्क राखून ठेवला आहे.

११. सदर सूचना ही कायद्याच्या इतर प्रयोज्य तरतुदीअंतर्गत आवश्यक मानल्यानुसार कायदेशीर प्रक्रिया आणि किंवा अशी अन्य कारवाई करण्यासाठी बँकेच्या हक्काला बाधा येऊ न देता आहे.

१२. तुम्ही आगावु वेळ ठरवुन तुमच्या वरील कर्ज खात्याशी संबंधित बँकेने ठेवलेल्या खात्याचे विवरण आणि तारण दस्तावेज पाहण्यासाठी मोकळे आहात.

आपला स्नेहांकित
सही/-
(श्री. मिलिंद एम. देव)
प्राधिकृत अधिकारी

प्रत प्रेषण माहिती आणि आवश्यक कृती करता :

१) श्री. मधुभाई शामजीभाई ठुमार (जामीनदार)
४०१, खोडीयार अपा., दौलत नगर, रोड नं. ६, बोरिवली (पूर्व), मुंबई – ४०००६६
२) श्री. बाबुलाल भवानजीभाई कपाडिया (जामीनदार)
बी-६०१, माधव कुंज सीएचएसएल, एस. व्ही. पी. रोड, सोडावाला लेन कॉर्नर, बोरिवली (पश्चिम) मुंबई – ४०००९३
३) अध्यक्ष/सेक्रेटरी
दहिसर संस्कृती सीएचएस लि., आनंद नगर, न्यू लिंक रोड, दहिसर (पूर्व), मुंबई – ४०००६८
४) अध्यक्ष/सेक्रेटरी
कनाल इंडस्ट्रियल प्रिमायसेस को-ऑप. सो. लि., दौलत नगर रोड नं. ६, बोरिवली (पूर्व), मुंबई – ४०००६६
५) अध्यक्ष/सेक्रेटरी
जानकी ॲव्हेन्यू, रविराज रेसिडेन्सी जवळ, आझाद नगर पुढे, काशिमिरा रोड, भाईंदर (पूर्व) ठाणे
६) अध्यक्ष/सेक्रेटरी
मार्बल आर्च सीएचएस लि., टी. पी. एस. – III, एकसर रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई – ४०००९२.

परिशिष्ट
(मिळकतींचे वर्णन)

१. दहिसर गाव, तालुका-बोरिवली, एम. एस. डी. च्या सी.टी.एस. क्र. १३६१-ए, १३६२-ए व १३२५ (भाग) मधील सोसायटी नोंदणी क्र. एमयुएम/डब्ल्युआर/एचएसजी/टीसी/१४०५५/२००७-२००८ असलेल्या आनंद नगर, न्यू लिंक रोड, दहिसर (पूर्व), मुंबई – ४०००६८ येथे स्थित दहिसर संस्कृती सीएचएस लि., ह्या आताच्या नावाच्या ''संस्कृती अपार्टमेंट'' नावाच्या इमारतीच्या ''ए'' विंग मधील तळ मजल्यावरील ९०० चौ. फूट बिल्टअप मोजमापित ते सर्व दुकान क्र. ९ (श्री. दीपक डी. पटेल यांच्या मालकीचे)

२. एकसर गाव, तालुका बोरिवली, एम.एस.डी. च्या सी.टी.एस. क्र. २४८६ व सर्व्हे क्र. १७७ आणि प्लॉट क्र. ३२ मधील सोसायटी नोंदणी क्र. बीओएम/डब्ल्युआर/जीएनएल/(ओ)/१०७४/१९८५-१९८६ असलेल्या १ ला मजला, कनाल इंडस्ट्रीयल प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., दौलत नगर रोड नं. ६, बोरिवली (पूर्व), मुंबई – ४०००६६ येथील ५४० चौ. फूट बिल्टअप मोजमापित तो सर्व गाळा क्र. २३ (सौ. जयाबेन डी. पटेल यांच्या मालकीचा)

३. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील घोडदेव गाव, ता. व जि. ठाणे च्या जुना सर्व्हे क्र. ३४८, हिस्सा क्र. ६ए आणि नवा सर्व्हे क्र. ९६, हिस्सा क्र. ६ए मधील रवीराज रेसिडेन्सी जवळ, आझाद नगर पुढे, काशिमिरा रोड, भाईंदर (पूर्व) ठाणे येथील जानकी ॲव्हेन्यू नावाच्या इमारतीच्या ''ए'' विंग पहिला मजला येथील ५३.०२ चौ. मी. बिल्टअप मोजमापित ऑफिस नं. ०१ आणि ५२.३८ चौ. मी. बिल्टअप मोजमापित ऑफिस नं. ०२ (श्री. मेहुल देवचंदभाई पटेल व सौ. रेशमा मेहुल पटेल यांच्या मालकीचे)

४. एकसर गाव, तालुका बोरिवली, एम.एस. डी. च्या सी.टी.एस. क्र. ५२४ आणि अंतिम प्लॉट क्र. १७३ मधील सोसायटी नोंदणी क्र. बीओएम/डब्ल्युआर/एचएसजी/टीसी/१०३८५/१९९९-२००० असलेल्या ''बी'' विंग मार्बल आर्च को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., टी.पी.एस. – III एकसर रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई – ४०००९२ मधील ६ व्या मजल्यावरील ३७ चौ. मी. मोजमापित फ्लॅट क्र. ६०३ व ३७ चौ. मी. मोजमापित फ्लॅट क्र. ६०४ (श्री. देवचंदभाई रावजीभाई पटेल यांच्या मालकीचे आणि ७ व्या मजल्यावरील ३७ चौ. मी. मोजमापित फ्लॅट क्र. ७०३ व ३७ चौ. मी. मोजमापित फ्लॅट क्र. ७०४. (सौ. जयाबेन डी. पटेल यांच्या मालकीचे)

• उपरोल्लेखित मराठी मजकुराच्या काही संदिग्धता असल्यास / आढळल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.

राष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठा समोर

सी. ए. (सीएए)/६५/एमबी/२०२०
शी संबंधित
सी. पी. (सीएए)/९३९/एमबी/२०२०
कंपनी अधिनियम, २०१३ च्या प्रकरणांत
आणि
कंपनी अधिनियम, २०१३ ची कलमे २३० ते २३२ आणि कंपनी अधिनियम, २०१३ च्या अन्य प्रयोज्य तरतुदी आणि त्याअंतर्गत बनवलेल्या नियमांच्या प्रकरणांत
आणि
वेलवर्थ कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड जीचा सीआयएन- यु६७१९०एमएच२००७पीटीसी१७६३६७ (हस्तांतरक कंपनी) च्या वेलवर्थ फायनान्शीअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड जीचा सीआयएन- यु६५९९०एमएच१९९५पीटीसी०९२३३२ (हस्तांतरक कंपनी) शी आणि त्यांच्या संबंधित भागधारकांच्या अंतर्लयनाने विलिनिकरणाच्या योजनेच्या (''योजना'') प्रकरणांत

वेलवर्थ कॅपिटल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ... पहिली याचिकाकर्ती कं./हस्तांतरक कं.
वेलवर्थ फायनान्शीअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड .... दुसरी याचिकाकर्ती कं./हस्तांतरिती कं.
(एकत्रित उल्लेख 'याचिकाकर्त्या कंपन्या')

**याचिकेच्या सुनावणी